महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- म.आ/साप्रवि/२२४४
दिनांक :- ०८/०७/२०२०

# आदेश

विषय:- पुणे महानगरपालिकेतील वर्ग १ ते ३ मधील मनपा अधिकारी/कर्मचा-यांनी त्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल/ गोपनीय अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सिएफआर १२९५/प्र.क्र.३६/९५/तेरा, दिनांक १/२/१९९६.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सिएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १/११/२०११.

३. महापालिका आयुक्त कार्यालयाकडील कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था-४/१४० दिनांक ४/४/२०१९

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सिएफआर १२२०/प्र.क्र.३२/का.१३, दिनांक २३/४/२०२०.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे , जतन करणे बाबतच्या एकत्रित सूचना दिलेल्या आहेत. संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये गट "अ"ते "क" चे अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याच्या सुचनांमध्ये आणखी सुधारणा केलेल्या होत्या व त्या सुधारणाप्रमाणे सध्या पुणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही केली जात आहे.

मनपा प्रशासनाचे वेळोवेळी निर्गत केलेल्या कार्यालयीन आदेशान्वये /परिपत्रकान्वये सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल / गोपनीय अहवाल भरून दरवर्षी आर्थिक वर्षे संपल्यानंतर लगेचच सादर करणे आवश्यक आहे .

संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये गोपनीय अहवाल सादर करणेबाबत मुदतवाढ देण्यासंबंधी आदेश निर्गत करण्यात आला आहे. सध्या राज्यामध्ये कोरोना (COVID १९) विषाणूच्या पार्श्वभूमीवर अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यालयाचे कामकाज सुरु ठेवण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१९-२० चे गोपनीय अहवाल शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार विहित कालावधीत करणे शक्य होणार नाही.

तसेच संदर्भ क्र.४ च्या कार्यालयीन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे गोपनीय अहवाल सादर करण्यासाठी सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी देखील खालील वेळापत्रक लागू संदर्भांकित आदेशान्वये कळविण्यात येत आहे.

| कार्य | यापूर्वी निश्चित करण्यात आलेली अंतिम तारीख | सुधारित अंतिम तारीख |
|---|---|---|
| विभाग/कार्यालयाच्या संस्करण अधिकाऱ्यांनी / अस्थापना अधिकाऱ्यांनी कार्यमुल्यमापन अहवालातील भाग १ भरून कार्यमुल्यमापन अहवालाचा नमुना अधिकारी/कर्मचारी यांना देणे | मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा ते १ एप्रिल | जून २०२० चा शेवटचा आठवडा ते १ जुलै, २०२० |
| स्वयंमुल्यनिर्धारण | १५ एप्रिल | १५ जुलै, २०२० |
| प्रतिवेदन अधिकाऱ्याचे मूल्यमापन | ३० एप्रिल | ३१ जुलै, २०२० |
| पुनर्विलोकन अधिकाऱ्यांचे मूल्यमापन | १५ मे | १५ ऑगस्ट, २०२० |
| संबंधित अधिकाऱ्यास प्रत उपलब्ध करून देणे | ३० जून | ३० सप्टेंबर, २०२० |

तरी, वरील प्रमाणे आणि मे.राज्य शासनाकडील वेळोवेळीचे आदेश/निर्देशांनुसार प्रकरणपरत्वे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत,
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/ई)
यांजकडे माहितीसाठी...

प्रति,
खातेप्रमुख (सर्व)
उप आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. १ ते ५)
महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते १५)
पुणे महानगरपालिका
यांजकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी....